# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

वर्ष–४

अंक–४


# कल्याण ग्रामीण विधानसभेत

## यंदा दिवा शहराचा आमदार?



**दिवा :– विधानसभा निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. जसजशी निवडणूक जवळ येत आहे तसे राजकीय वातावरण तापू लागले आहे. सर्व इच्छुक उमेदवार मतदार संघात तयारीला लागले आहेत.कल्याण ग्रामीण मध्ये सध्या मनसेचे राजू पाटील आमदार आहेत. मात्र दुसरीकडे शिवसेना शिंदे गटाचे दिवा शहर प्रमुख रमाकांत मढवी हे जोरदार तयारीला लागले असून त्यांना उमेदवारी मिळाल्यास या दोघांसमोर शिवसेना ठाकरे गटाचे माजी आमदार सुभाष भोईर यांचे आव्हान असणार आहे.**

सुहास खंडागळे दिवा न्यूज विशेष

मागील काही वर्षात दिवा शहराची लोकसंख्या जशी वाढली आहे,तसेच येथील मतदारांची संख्या देखील वाढली आहे. साधारण एक लाखाच्या आसपास येथील मतदार संख्या असून कल्याण ग्रामीणचा आमदार ठरवण्यात दिवा शहर महत्वाची भूमिका बजावणार आहे. महायुती म्हणून एकत्रित निवडणुका लढल्यास राजू पाटील यांचे पारडे जड होते. मात्र मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एकला चलो रे ची भूमिका घेतल्याने भाजप – शिवसेना शिंदे गट यांचाही उमेदवार या मतदार संघात उतरेल अशी स्थिती आहे.त्या दृष्टीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विश्वासू रमाकांत मढवी यांनी एक वर्षापासूनच विधानसभा मतदारसंघात बांधणी करण्यास सुरुवात केली आहे. विधानसभा मतदारसंघात जनसंपर्क वाढवण्याच्या दृष्टीने त्यांनी विविध उपक्रम हाती घेतले आहेत.दिवा शहर आणि परिसराचा विचार करायचा झाल्यास रमाकांत मढवी यांचे पारडे आजच्या घडीला मजबूत आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांनी मागील पाच वर्षांच्या कार्यकाळात दिवा शहराकडे दिलेले विशेष लक्ष रमाकांत मढवी यांना उमेदवारी मिळाल्यास मढवी यांच्यासाठी फायद्याचे ठरू शकते. तर दुसरीकडे दिव्याचे सुपुत्र असणारे सुभाष भोईर हे शिवसेना ठाकरे गटाकडून निवडणूक लढण्याची शक्यता असल्याने त्यांचा दिवा शहरात असलेला दांडगा जनसंपर्क, याआधी आमदार म्हणून केलेली कामे आणि सत्तेविरोधात असलेली मते, महायुतीच्या मतांमध्ये होणारी संभाव्य विभागणी याचा विचार करून भोईर यांनाही या निवडणुकीत यश मिळू शकते असे त्यांना मानणाऱ्या वर्गाचे मत आहे. भोईर हे लोकसभा निवडणुकीनंतर मोठ्या प्रमाणात सक्रिय झाले असून थेट सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना हात घालण्यास त्यांनी सुरुवात केली आहे. दिवा शहरावर भोईर यांनी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. सुभाष भोईर आणि शिवसेना शिंदे गटाचे रमाकांत मढवी हे दोघेही दिवा शहराशी संबंधित असल्याने या वेळच्या कल्याण ग्रामीण विधानसभा निवडणुकीत दिव्याचा आमदार होणार का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.






दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. २६ ऑगस्ट २०२४ पान : २

# दहीहंडी आणि गणेशोत्सव यांच्यासाठी आलेले मंडप परवानगीचे अर्ज विनाविलंब मंजूर करावेत

## -अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे

**ठाणे :** दहीहंडी उत्सव आणि गणेशोत्सव यांच्यासाठी ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने आलेले मंडप परवानगीचे अर्ज सहायक आयुक्तांनी विनाविलंब मंजूर करावेत, असे निर्देश ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी दिले आहेत. दहीहंडीच्या मंडपासाठी ५१ तर गणेशोत्सवाच्या मंडपांसाठी १५७ अर्ज आले असून त्यांच्या परवानगीची प्रक्रिया सुरू झाली आहे.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी गणेशोत्सव तयारीबाबत केलेल्या सूचनांनुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा अतिरिक्त आयुक्त रोडे यांनी गुरुवारी घेतला. या बैठकीस, उपायुक्त मनीष जोशी, जी. जी. गोदेपूरे, शंकर पाटोळे, दिनेश तायडे, मनोहर बोडके यांच्यासह सर्व सहायक आयुक्त, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, उपनगर अभियंता विकास ढोले, सुधीर गायकवाड, शुभांगी केसवानी आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंडळांकडून परवानगीसाठी आलेले अर्ज सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस, वाहतूक पोलीस, अग्निशमन दल यांच्याकडील आवश्यक परवानगी, ना हरकत दाखला घेवून प्रभाग समिती स्तरावर तत्काळ मार्गी लावावेत. किती परवानगी देण्यात आली, त्यात काही विलंब होत नाही ना याचा सहायक आयुक्त आणि परिमंडळ आयुक्त यांनी दैनंदिन स्वरूपात आढावा घ्यावा, असे अतिरिक्त आयुक्त रोडे यांनी सांगितले.



महापालिका मुख्यालयात गणेशोत्सव मंडळांच्या प्रतिनिधींसोबतच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार विविध विषयांचा आढावाही यावेळी घेण्यात आला. त्यात, मोठे आणि अंतर्गत असे सगळे रस्ते खड्डेमुक्त राहतील यांची दक्षता बांधकाम विभागाने घ्यायची आहे. तसेच, गणेश मूर्तींच्या आगमन आणि विसर्जन मार्गातील झाडांच्या फांद्यांची छाटणी वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी उद्यान विभागाची आहे, त्यात कोणतीही हयगय नको, असेही अतिरिक्त आयुक्त रोडे यांनी स्पष्ट केले. विसर्जन घाट आणि परिसर तेथील व्यवस्था यांचीही माहिती या बैठकीत देण्यात आली. मंडळांनीही आवश्यक त्या सर्व परवानगी वेळेत घ्याव्यात. त्यापैकी मंडप परवानगी ही मंडळांच्या दर्शनी भागात लावावी. तसेच, वाहतुकीला कोणताही अडथळा होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील असून त्यास मंडळांनी सक्रिय साथ द्यावी, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी यानिमित्ताने केले आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी दरवर्षी महापालिका आरास स्पर्धेचे आयोजन करते. त्यात एकूण आठ पारितोषिके दिली जातात. प्रथम क्रमांकास १० हजार, द्वितिय क्रमांकास ७५०० आणि तृतीय क्रमांकास ६५०० रुपये असे पारितोषिक असते. स्पर्धेतील सहभागासाठी २ सप्टेंबरपर्यंत मंडळांना माहिती व जनसंपर्क विभागाच्या कार्यालयात अर्ज सादर करता येतील. या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही अतिरिक्त आयुक्त रोडे यांनी केले आहे.




# मुंब्र्यात कोसळली दरड

**ठाणे :** मुंब्रा बायपास, या ठिकाणी शीळकडून ठाणे कडे जाणाऱ्या रस्त्यावर दरड कोसळली. ही घटना शनिवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास समोर आली. या पडलेल्या दरडीने वाहतुकीवर तुरळक परिणाम झाला. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसून रस्त्यावर कोसळलेली दरड जेसीबी मशीनच्या साहाय्याने बाजूला करण्यात आली असून रस्ता वाहतुकीसाठी पुर्णपणे मोकळा करण्यात आला आहे.

मुंब्रा बायपास रस्त्यावर दरड कोसळली आहे.अशी माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान तसेच आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांनी धाव घेतली. तातडीने रस्त्यावर कोसळलेली दरड आणलेल्या जेसीबी मशीनच्या साहाय्याने बाजूला केली. त्यामुळे रस्ता वाहतुकीसाठी पुर्णपणे मोकळा केला आहे. तसेच त्याठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने धोकापट्टी बांधण्यात आली आहे.

याशिवाय घटनास्थळी उर्वरित भागही धोकादायक स्थितीत असल्याने त्याची माहिती वनविभागामध्ये देत,पुढील कार्यवाहीच्या सूचना दिल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.




# जागतिक विश्वविक्रम मोडणाऱ्या गोविंदा पथकास रोख २५ लाखाचे पारितोषिक

**ठाणे :** दहीहंडी अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. दरवर्षी प्रमाणे यावर्षी ही दहीहंडी सण मोठ्या उत्साहात, जल्लोषात साजरा करण्यात येणार आहे. यंदा पहिले नऊ थर लावणाऱ्या गोविंदा पथकास ११ लाखांचे बक्षीस देण्यात येणार आहे. तसेच रोख रक्कम, आकर्षक सन्मान चिन्ह देऊन या गोविंदांना गौरविण्यात येणार आहे. या दहीहंडीसाठी कलाकार आणि राजकीय नेते देखील उपस्थित असणार आहे.

दहीहंडी उत्सवाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ठाण्यातील वर्तक नगर येथील संस्कृतीची विश्वविक्रमी दहीहंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या दहीहंडी उत्सवात ९ थर लावणाऱ्या गोविंदा पथकास ५ लाख व आकर्षक ट्रॉफी, ८ थर लावणाऱ्या गोविंदा पथकास २५ हजार व आकर्षक ट्रॉफी, ७ थर लावणाऱ्या गोविंदा पथकास १५ हजार व सन्मानचिन्ह, ६ थर लावणाऱ्या गोविंदा पथकास १० हजार व सन्मानचिन्ह, ५ थर लावणाऱ्या गोविंदा पथकास ५ हजार व सन्मानचिन्ह तसेच मुंबई, ठाणे येथील महिलांचे गोविंदा पथकाला सुद्धा विशेष मान देण्यात येणार असून त्यांच्यासाठीही विशेष पारितोषिक ठेवले आहे.

आमदार प्रताप सरनाईक यांच्या ठाण्यातील संस्कृती युवा प्रतिष्ठानतर्फे यावर्षी जागतिक विश्वविक्रम मोडणाऱ्या गोविंदा पथकास २५ लाखाचे बक्षीस जाहीर केले आहे. यंदा प्रो गोविंदा सीझन २ देखील मोठ्या उत्सहात आणि दिमाखात पार पडला. गोविंदा हा खेळ मातीपासून ते मॅटपर्यंत पोहचला आणि अपघाताचे सत्र थांबले जावे हा प्रो. गोविंदामागील उद्देश आहे, असे आमदार प्रताप सरनाईक यांनी सांगितले. तसेच राज्य शासनाने गोविंदा खेळाचा क्रीडा प्रकारात समावेश केला आहे. यंदा गोपाळकाल्याला सार्वजनिक सुट्टी देखील जाहीर करण्यात आली आहे. गोविंदांच्या काळजी पोटी शासनातर्फे ७५ हजार गोविंदांचा मोफत विमा काढण्यात येत आहे. यंदाचा गोविंदा अपघात मुक्त व्हावा यासाठी प्रयत्न करूया, असे आवाहन आमदार प्रताप सरनाईक यांनी केले. संस्कृती प्रतिष्ठान आयोजित दहीहंडी उत्सवात युवा पिढीस प्रोत्साहन देण्यासाठी फोटोग्राफी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे असे युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांनी सांगितले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# बदलापूर घटनेच्या निषेधार्थ शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने दिव्यात निषेध आंदोलन




**दिवा :–** बदलापूर येथे लहान मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ शनिवारी सकाळी शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने दिवा शहरात निषेध आंदोलन करण्यात आले.

यावेळी दिवा शहरातील शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी तोंडाला काळ्या पट्ट्या बांधून व हाताला काळ्या पट्ट्या बांधून या घटनेचा निषेध नोंदवला.त्याचबरोबर सरकारच्या भूमिकेचा निषेधही यावेळी आंदोलनकर्त्यांनी केला. दिवा स्टेशन परिसरात शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या वतीने हे निषेध आंदोलन करण्यात आले.यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




# ठाणे-बोरिवली भुयारी मार्गाच्या कामात ठाणे महापालिकेचे सर्वतोपरी सहकार्य

## महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी घेतला प्रकल्पाशी निगडीत विषयांचा आढावा

**ठाणे :** ठाणे आणि बोरिवली मधील प्रवासाचे अंतर अवघ्या १२ मिनिटांवर आणण्याची क्षमता असलेल्या ठाणे – बोरिवली भुयारी मार्ग प्रकल्पातील ठाणे महापालिकेकडील विषयांचा आढावा महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी नुकताच घेतला.

ठाणे – बोरिवली भुयारी मार्गाचे काम एमएमआरडीए करीत आहे. या प्रकल्पाचे भूमिपूजन मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले असून याचा बहुतांश भाग हा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या खालून जाणार आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रातील भूसंपादन, अतिक्रमणे हटविणे, वृक्ष प्राधिकरणाकडून आवश्यक परवानगी आदी ठाणे महापालिकेशी निगडीत विषय एमएमआरडीए आणि बांधकाम कंपनीच्या प्रतिनिधींनी आयुक्त सौरभ राव यांच्या समोर मांडले. या बैठकीस, अतिरीक्त आयुक्त प्रशांत रोडे, सहायक संचालक, नगर रचना संग्राम कानडे, उपायुक्त (उद्यान) मनोहर बोडके, उपनगर अभियंता विकास ढोले आदी उपस्थित होते.

महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष बांधकाम स्थळी भेट देवून पाहणी केलेली आहे. त्यानुसार, परवानगीबद्दलचे विषय मार्गी लागतील. जलवाहिनी स्थलांतर, उद्यानासाठी वेगळा प्रवेश मार्ग आदी बाबींबाबत एकत्रित पाहणी करून लगेच निर्णय घेतला जाईल, असे आयुक्त राव यांनी या बैठकीत स्पष्ट केले.

भुयारी मार्गाच्या बांधकामासाठी दररोज मोठ्या प्रमाणावर पाणी लागणार आहे. त्यासाठी ठाणे महापालिकेच्या एसटीपीमधील प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर करण्याची सूचना आयुक्त राव यांनी केली. त्यासंदर्भात, महापालिकेच्या बांधकाम विभागाशी समन्वय साधून पाण्याचे नियोजन करण्याची ग्वाही देण्यात आली.

# तरुणाईचा उत्साह, थरांचा थरथराट आणि ठाण्याची सामाजिक बांधिलकी

## भाजपचे कृष्णा पाटील आयोजित ५५ लाखांची गोकुळ हंडी वेधणार ठाणेकरांचे लक्ष

**ठाणे:–** मागील वर्षी प्रमाणे यावर्षीही ठाण्यात शारदा संकल्प प्रतिष्ठानच्या गोकुळहंडीची धूम पाहायला मिळणार आहे. भाजपचे नगरसेवक कृष्णा पाटील यांच्याकडून या दहीहंडीचे आयोजन करण्यात आले आहे.

गोकुळ दहीहंडी ही ठाण्यातील एक प्रतिष्ठित दहीहंडी बनली असून यामध्ये एकूण ५५ लाखांची बक्षिसे आयोजकांकडून जाहीर करण्यात आली आहेत. प्रथम नऊ थर लावणाऱ्या गोविंदा पथकास ५ लाख ५५ हजार ५५५ रोख रक्कम व चषक बक्षीस दिले जाणार असून पुढील प्रत्येक नऊ थरास रुपये ३ लाख ३३ हजार ३३३ रुपये रोख रक्कम व चषक बक्षीस म्हणून दिले जाणार आहेत. ठाण्याची हंडी २ लाख २२ हजार २२२ रुपये व चषक त्याचबरोबर मानाची गोकुळ हंडी महिला गोविंदा पथकास एक लाख ११ हजार १११ व चषक अशी रक्कम बक्षीस दिली जाणार आहे. याशिवाय आठ थराची सलामी ५१ हजार व चषक,सात थराची सलामी १२००० व चषक, सहा थराची सलामी ९००० व चषक,पाच थराची सलामी ५००० व चषक, चार थराची सलामी ३००० व चषक, अशी बक्षिसे पुरुष गटासाठी असून सात थराची सलामी २५००० व चषक, सहा थराची सलामी १५००० व चषक, पाच थराची सलामी दहा हजार व चषक, चार थराची सलामी ३००० चषक अशी बक्षिसे महिलांसाठी ठेवण्यात आली आहेत.

मागील वर्षी या दहीहंडीच्या निमित्ताने अर्जुन पुरस्कार विजेते त्याचप्रमाणे शिवछत्रपती पुरस्कार विजेते, व अन्य क्षेत्रातील क्रीडापटूंचा सत्कार करण्याचा अनोखा सामाजिक उपक्रम आयोजकांनी राबवला होता. यावर्षीही ठाण्याच्या हिताचे सामाजिक उपक्रम या दहीहंडीच्या निमित्ताने राबवले जातील असे आयोजक कृष्णा पाटील यांनी सांगितले आहे. ठाण्याच्या मूलभूत नागरिक समस्यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न या दहीहंडीच्या माध्यमातून केला जाणार असल्याचे कृष्णा पाटील यांनी सांगितले. गोकुळ दहीहंडी ही हिंदू सणांचे प्रतीक बनतानाच तरुणाईचा उत्साह आणि शहराच्या सामाजिक बांधिलकीची जाणीव याची सांगड घालणारी अनोखी दहीहंडी ठरेल असेही कृष्णा पाटील म्हणाले.या दहीहंडी निमित्त गोविंदांच्या मनोरंजनासाठी आर्केस्ट्रा, सिने कलाकार त्याचबरोबर मान्यवर लोकांच्या भेटीगाठी व मार्गदर्शन लाभणार असल्याचे कृष्णा पाटील यांनी यावेळी सांगितले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. २६ ऑगस्ट २०२४


# कोपरी शिवसेना शाखेतर्फे मुख्यमंत्री दहीहंडी उत्सव

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांची उपस्थिती

## गोविंदासाठी तब्बल १ लाख ११ हजारांची बक्षिसे

**ठाणे :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि ठाणे आणि कल्याण संपर्क प्रमुख खासदार नरेश म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरी परिसरातील अष्टविनायक चौकात शिवसेना कोपरी विभागाच्या वतीने आयोजित दहीहंडी उत्सवात एकूण १ लाख ११ हजार १११ रुपयांचे बक्षिसे देण्यात येणार आहेत. मंगळवारी २७ ऑगस्ट रोजी होणाऱ्या या दहीहंडी सोहळ्याला राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे त्याचबरोबर कोपरी पाचपाखाडी विधानसभा शहर प्रमुख राम रेपाळे आणि ठाणे जिल्हा महिला संघटक मिनाक्षी शिंदे सुद्धा उपस्थित राहणार आहेत अशी माहिती शिवसेना कोपरी पदाधिकारी , महिला पदाधिकारी आणि युवा सेनेचे पदाधिकारी यांच्या वतीने देण्यात आली आहे.

कोपरी परिसरातील अष्टविनायक चौकात दहीहंडी उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. यंदाचे उत्सवाचे ३ रे वर्ष असल्याने कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह आहे. यंदा मुंबई-ठाण्यासाठी एक दहीहंडी, महिलांसाठी दहीहंडी आणि कोपरीकरांसाठी एक हंडी अशा तीन हंड्या येथे उभारल्या जातात. आठ थरांसाठी २१ हजारांचे रोख पारितोषिक तसेच सन्मानचिन्ह तर साथ थरांची ११ हजार रुपये सहा थरांसाठी ६००० पाच थरांसाठी ५००० आणि चार थरांसाठी ३००० लावणाऱ्या गोविंदा पथकांना एकुण १ लाख ११ हजार एकशे एकरा रुपयांचे रोख पारितोषिके तसेच सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. याशिवाय स्थानिक गोविंदांना तसेच महिलावर्गासाठी आणि उत्तेजनार्थ पारितोषिकांचे वितरण करण्यात येणार आहे.

गोविंदा पथकांच्या सुरक्षिततेसाठी सेफ्टी बेल्ट, रुग्णवाहिका, आणि डॉक्टर्स तैनात असणार आहेत . दहीहंडी सोहळ्यासाठी, दिवसभर मनोरंजनाच्या कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे. यंदा या दही हंडी सोहळ्याला राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असुन शिवसेनेचे आमदार आणि सर्वपक्षीय नेत्यांबरोबरच मराठी सिनेनाटय कलाकारांची उपस्थिती हे या दहीहंडी उत्सवाचे खास आकर्षण असणार आहे. अशी माहिती उपशहर प्रमुख प्रकाश कोटवानी , विभागप्रमुख संतोष बोडके आणि प्रशांत पाटील यांनी यावेळी दिली.

# शेतकऱ्यांसाठी जाहीर आवाहन

**ठाणे :** कृषी विभागाकडील भात पीक कीड व रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प २०२४-२५ (क्रॉपसँप) योजनेतंर्गत भात पिकावरील कीड व रोगांचे क्षेत्रीय स्तरावरील कृषी सहाय्यक व कृषी पर्यवेक्षक यांच्यामार्फत नियमित सर्वेक्षण चालू आहे. तसेच एम किसान मोबाईल पोर्टल वरुन नोंदणीकृत शेतकऱ्यांना नियमित साप्ताहिक संदेशही पाठवले जात आहेत.

मागील वर्षी जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी खोडकिड्याचा प्रादुर्भाव काही प्रमाणात आढळून आला होता. या ऑगस्ट महिन्यात पावसाने आता विश्रांती घेतलेली आहे. तसेच हवामान ढगाळ आहे. अशा प्रकारचे हवामान भात पीकावरील किड रोगासाठी पोषक असून खोडकिड्याचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी भात पीकांवर करपा व खोडकिड्याचा प्रादूर्भाव आढळून येत आहे. त्याकरीता शेतकरी बाधवांनी खोडकिडा करीता नियमित पाहणी करावी. पाहणीत शेतामध्ये प्रती चौ.मी.क्षेत्रात ०१ अंडी पुंजका किंवा १० टक्के कीडग्रस्त फुटवे आढळून आल्यास नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस २५ टक्के प्रवाही २६ मिली किंवा कारटॅप हायड्रोक्लोराईड ५० टक्के १२ ग्रॅम किंवा ट्रायझोफॉस ४० टक्के २७ मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात किटकनाशक फवारणीसाठी वापरावे. करपा रोगाच्या नियंत्रणासाठी ट्रायसाक्लॉझॉल ७५ टक्के डब्लू.पी.१०ग्रॅम किंवा आयसोप्रोथिओलेन ४० टक्के प्रवाही १५ मिली यापैकी एका बुरशीनाशकाच्या तीन फ़वारण्या १५ दिवसाच्या अंतराने प्रती १० लिटर पाणी याप्रमाणात कराव्यात. शेतकऱ्यांनी खोडकिडयाच्या नर पतंगाला आकर्षित करुन बंदोबस्त करण्यासाठी कामगंध सापळे (फेरोमन ट्रॅप्स) वापरावेत. हे कामगंध सापळे प्रती हेक्टरी २० या प्रमाणात वापरावे. या सापळ्याचे ल्युर्स दर ४५ दिवसांनी नियमितपणे बदलावे. असे कामगंध सापळे शेतात लावल्याने शेतातील खोडकिड्याचे नर पतंग मोठ्या प्रमाणात सापळ्यात अडकले जातात व त्यामुळे खोडकिडीची पुढील पिढी तयार होत नाही. याबाबत अधिक तांत्रिक माहितीसाठी आपल्या गांवच्या कृषी सहाय्यक / कृषी पर्यवेक्षक यांच्याकडे किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन उपविभागीय कृषी अधिकारी कल्याण सुधीर व.नाईनवाड यांनी केले.

# शक्ती कायदा अमलात आणावा, यासाठी शिवसेनेचे ठाणे रेल्वे स्थानकात स्वाक्षरी मोहीम

**ठाणे :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या युवा व युवती सेनेच्या वतीने गुरुवारी ठाणे रेल्वे स्थानकात महाविकास आघाडीच्या काळात तयार केलेला शक्ती कायदा विधेयक याची अंमलबजावणी करून तो कायदा महाराष्ट्र राज्यात लागू करावा, यासाठी स्वाक्षरी मोहीम घेण्यात आली. या मोहिमेला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला

महाराष्ट्रात गेल्या दोन अडीच वर्षात महिलां व मुलींवरील एका मागून एक अशा सातत्याने होणाऱ्या अत्याचारांचे घटनांचे प्रमाण अधिक वाढत असल्याने याला कुठेतरी चाप बसावा मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेपेक्षा लाडकी सुरक्षा बहीण योजना अमलात आणावी अशी सर्व सामान्य महिलांची मागणी मोठ्या प्रमाणावर होत आहे परंतु यावर सरकार योग्य उपायोजना करण्यास निष्क्रिय ठरल्याने या घटनाबाह्य सरकार विरुद्ध स्वाक्षरी मोहिमेद्वारे निषेध करण्यात आला

या स्वाक्षरी मोहिमेला संपर्कप्रमुख नरेश मनेरा ,जिल्हाप्रमुख केदार दिघे, महाराष्ट्र राज्य युवती सेनेच्या कार्यकारणी सदस्य धनश्री विचारे, सहसचिव रोशनी शिंदे,लविभाग प्रमुख प्रकाश पायरे, राजेंद्र महाडिक प्रदीप पुर्णकर ,संजय कुलकर्णी, प्रशांत सातपुते, शिवाजी कदम ,युवा सेनेचे निखिल पितळे ,सौरभ निकम, राज वर्मा,महिला व युवती सेनेच्या पदाधिकारी आकांक्षा राणे सुनंदा देशपांडे,अपर्णा भोईर, रसिका सुभेदार, कल्पित पाटील, रूपाली लोहाटे, संध्या हुमणे, सीमा रजपूत, नंदा कोथळे, कविता नार्वेकर, सुरेखा भोसले, प्रज्ञा सावंत ,विद्या कदम, उषा बोराडे, अंजली दळवी, मानसी पालवे, निकिता आरकडे ,विना डेवाडे ,वैशाली मोरे ,सायली साळवे व इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. २६ ऑगस्ट २०२४
पान : ५
www.diwanews.com

# विविध रेल्वे विषयक मागण्याबाबत विजय भोईर यांच्या नेतृत्वाखाली काळ्या फिती बांधून निषेध आंदोलन



दिवा :- गुरुवार दिनांक २२ ऑगस्ट रोजी मध्य रेल्वे वरील सर्व मुंबई व उपनगरी रेल्वे प्रवासी संघटनांनी रेल्वे प्रशासनाकडे आपल्या विविध मागण्या सोडवण्यासाठी सफेद कपडे काळी फीत आंदोलन आयोजिले होते. यामध्ये दिव्यातील संघर्ष कोकण रेल्वे प्रवासी संघटनेचे विजय भोईर यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने करण्यात आली. ज्यामध्ये सर्व प्रवाशांना काळी फित बांधून आपल्या मागण्यांकडे रेल्वे प्रशासन, महानगरपालिका, इत्यादी सर्वांचे लक्ष वेधण्यासाठी या निदर्शनांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. त्यांनी सर्व संघटनांच्या ज्या प्रमुख पाच मागण्या होत्या त्याचबरोबर दिवा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस लोकल तातडीने सुरू करण्यासाठी प्रमुख मागणी केली. *तसेच दिवा फाटक खोलल्यामुळे ट्रेन्सना जो विलंब होतो तो होऊ नये म्हणून दिवा आरओबी लवकरात लवकर सुरू करावा ही मागणी सुद्धा त्यांनी महापालिकेकडे या निदर्शनात व्यक्त केली.




लोकल ट्रेनमधून पडून अपघातात होणारे मृत्यू थांबवायचे असतील तर त्यांनी काही प्रमुख मागण्या या निदर्शनाच्या माध्यमातून व्यक्त केल्या.ज्यामध्ये ...

१) लोकल ट्रेन वेळेवर धावणे

२) पंधरा डब्याच्या लोकल्स वाढवणे ३)दिवा सीएसएमटी लोकल तातडीने सुरू करणे

४) पीक अवर्स मध्ये लोकलच्या ट्रॅक वरून मेल एक्सप्रेसना प्राधान्य न देता तिथून लोकल ट्रेन चालवल्या जाव्यात.

५) कळवा ऐरोली एलिवेटेड ट्रेनचा लवकरात लवकर प्रश्न मार्गी लावणे.





अशा विविध प्रवाशांच्या सुरक्षेशी निगडित विविध मागण्या या निदर्शनाच्या माध्यमातून व्यक्त केल्या. आणि या निदर्शनांवेळी दिव्याच्या रेल्वे प्रवाशांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या निदर्शनांमध्ये श्री. सचिन भोईर, समीर चव्हाण,प्रफुल्ल साळवी, रोशन भगत, अंकुश मढवी,अवधराज राजभर ,अमरनाथ गुप्ता, अजय सिंग, मनोज यादव, हरिहर राजभर,समशेर यादव, विनोद वर्मा,गयादीन यादव, रामराज सिंग, नंदू प्रजापती, रामपलट प्रजापती, सुरज पानसरे,अजित सानप, महेंद्र विश्वकर्मा,धर्मेंद्र गुप्ता, प्रमोद तिवारी, सत्यप्रकाश मिश्रा, रुणाली लाड सारिका बनसोडे, संगीता भोईर इत्यादी सर्व पदाधिकारी उपस्थित होते.





SHWAAS
ACE NX HOSPITAL & RESEARCH CENTRE
Superspeciality Hospital
Our Passion Your Care

२५,००० ते २,००,००० पर्यंत विमा योजना



मुख्यमंत्री सहायता निधी
CM Relief Fund

फुफ्फुस प्रत्यारोपण
हिप रिप्लेसमेंट
अपघात शस्त्रक्रिया
कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन)
लहान बालकांचे शस्त्रक्रिया
अपघात
हृदयरोग
डायलिसिस
हाताचे प्रत्यारोपण
गुडघ्यांचे प्रत्यारोपण
विद्युत अपघात रुग्न
नवजात शिशुंचे आजार
बर्न रुग्न
मेंदूचे आजार
कर्करोग शस्त्रक्रिया

Address
Mahavir height, Golul Nagari, opp. Mumbai University, Wayle Nagar, Khadakpada, Kalyan, Maharashtra- 421301

Emergency
7777008464
9076229076

# ठाण्यात शिवसेनेचे काळी फिती बांधून आंदोलन




**ठाणे:** साहेब... आम्हाला एक वेळ लाकडी बहीण योजना नसली तरी चालेल पण सुरक्षित बहीण योजना पाहिजे! अशा आशयाचे फलक हाती घेत, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या ठाणे जिल्हा शाखेच्या वतीने शिवसेना नेते माजी खासदार राजन विचारे यांच्या नेतृत्वाखाली बदलापूर येथे घडलेल्या घटनेचा निषेध करण्यासाठी काळी फिती बांधून ठाण्याच्या तलावपाळी येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा समोर महात्मा गांधी पुतळ्यासमोर शनिवारी महाविकास आघाडीच्या मुक आंदोलन करण्यात आले. त्यावेळी संपर्कप्रमुख नरेश मनेरा, जिल्हाप्रमुख केदार दिघे, सचिव विश्वास निकम, सचिन चव्हाण, सुरेश मोहिते ,सुनील पाटील ,संजय दळवी, राजेंद्र महाडिक ,प्रकाश पायरे, प्रतीक राणे, लहू सावंत, विद्या कदम, प्रमिला भांगे ,ज्योती कदम, सुनंदा देशपांडे, अनिता हिलाल, रोशनी शिंदे तसेच इतर शिवसेना, युवासेना- युवती सेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## ठाणे जिल्ह्यातील ४१ ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त

**ठाणे :** क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत उपक्रमात ठाणे जिल्हयात एकूण ४३१ ग्रामपंचायती आहेत. यातील शहापूर तालुक्यातील-१३ ग्रामपंचायती,मुरबाड तालुक्यातील -९ ग्रामपंचायती,कल्याण तालुक्यातील -७ ग्रामपंचायती,भिवंडी तालुक्यातील-६ग्रामंपचायती,अंबरनाथ तालुक्यातील -६ ग्रामपंचायतींना ठाणे नियोजन भवन येथे ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते गुरुवारी गौरविण्यात आले.

यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे, वैद्यकीय अधिकारी डॉ.अलका परगे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.गीता काकडे यांच्यासह ठाणे जिल्हयातील तालुका आरोग्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी शिनगारे म्हणाले की, दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत ठाणे जिल्हा क्षयरोगमुक्त झाला पाहिजे असे आपणास उद्दिष्ट देण्यात आले आहे. आपली सुरुवात चांगली झाली आहे. त्यामुळे आपले कौतुक करावेसे वाटते. क्षयरोगाचा कलंक आपण काढून टाकण्यामध्ये आपण यशस्वी झाला आहात. सामाजिक सुधारणा होण्यासाठी काही कालावधी जावा लागतो. आपला पल्ला खूप मोठा आहे आणि कालावधी खूप कमी आहे. आतापर्यंत आपण १० टक्के टप्पा पूर्ण केला आहे. उरलेला ९० टक्के टप्पा आपल्या पूर्ण करायचा आहे. क्षयरोग आपल्या गावात पुन्हा येवू नये, यासाठी दक्ष राहायला हवे. आपल्याला दिलेले उद्दिष्टे पूर्ण करायचे आहे. पहिल्या वर्षी आपल्या महात्मा गांधी यांचा कास्य रंगाचा पुतळा सलग दोन वर्षे असल्यास चंदेरी रंगाचा व सलग तीन वर्षे असल्यास सोनेरी रंगाचा पुतळा देण्यात येणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रामसेवक, सरपंच,आशा कर्मचारी यांच्या कामाचे कौतुक केले.

याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे यांनी गाव क्षयमुक्त होणे गरजेचे आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत क्षयमुक्त गाव करायचे आहे. कमी कालावधीतसुध्दा सर्वांनी चांगले काम केले आहे, असे सांगून सरपंच व ग्रामसेवक यांचे आभार मानले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तरुलता धानके व आभार प्रदर्शन डॉ. अलका परगे यांनी केले.














**दिव्यातील कार्यसम्राट माजी नगरसेवक शिवसेना उपशहर प्रमुख शैलेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना युवा शहरातील विविध मान्यवर महिलावर्ग व कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यार्थ्यांसाठी मोफत वह्या वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला.**

# गणेशोत्सवदरम्यान मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्गावर जड वाहनांना वाहतूक बंदी

**मुंबई :** गणेशोत्सवासाठी गणेश मुर्तीचे आगमन, गणेशमुर्तीचे विसर्जन, गौरी गणपती विसर्जन, परतीचा प्रवास आदींसाठी सार्वजनिक हितास्तव मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर वजनक्षमता १६ टन किंवा १६ टनांपेक्षा जास्त वाहनांना मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १५५ मधील तरतुदीनुसार वाहतूक बंदी करण्यात आली आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील मुंबई ते सावंतवाडी दरम्यान जड वाहनांना बंदी असणार आहे.

गणेशोत्सवाच्या पूर्व तयारीचा प्रवास म्हणून ५ सप्टेंबर रोजी मध्यरात्री १२ वाजेपासून ते ८ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजेपर्यंत या कालावधीत बंदी असणार आहे. तर ५ व ७ दिवसांच्या गणेशमुर्तीचे विसर्जन, गौरी गणपती विसर्जन, परतीचा प्रवासासाठी ११ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजेपासून ते १३ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजेपर्यंत, अनंत चतुर्दशी ११ दिवसांचे गणेशमुर्तीचे विसर्जन, परतीच्या प्रवासाकरिता १७ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते १८ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री ८ वाजेपर्यंत बंदी राहील.

या महामार्गावर बंदी असलेल्या कालावधी व्यतिरिक्त उर्वरित कालावधीत ज्यांची वजन क्षमता १६ टन किंवा १६ टनांपेक्षा जास्त आहे, अशा वाहनांना ८ सप्टेंबर रात्री ११ वाजेपासून ते ११ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता आणि १३ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजेपासून ते १७ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत वाहतूकीस परवानगी राहील. तसेच सर्व वाहनांना १८ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजेनंतर नियमित वाहतुकीस परवानगी राहील. हे निर्बंध दूध, पेट्रोल किंवा डिझेल, स्वयंपाकाचे गॅस सिलिंडर, लिक्विड मेडिकल ऑक्सिजन, अन्न धान्य, भाजीपाला व नाशवंत माल आदी जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या वाहनांना लागू राहणार नाही. तसेच मुंबई –गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ च्या रस्ता रुंदीकरण, रस्ता दुरूस्ती कामकाज आणि साहित्य, माल ने आण करणाऱ्या वाहनांना बंदी लागू राहणार नाही. यासंदर्भात वाहतूकदारांना संबंधित वाहतूक विभाग, महामार्ग पोलीस यांनी प्रवेशपत्र देण्याची कार्यवाही करावी.

कोकणात जाणाऱ्या गणेश भक्तांचा आणि महामार्गांचा विचार करून पोलीस आयुक्त, नवी मुंबई आणि संबंधित जिल्ह्यांचे पोलीस अधीक्षक यांनी जड, अवजड वाहनांवरील वाहतुकीचे निर्बंध शिथिल करण्याबाबत प्राप्त परिस्थितीनुसार आपल्या स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा. तसेच जेएनपीटी व जयगड बंदरातून आयात निर्यात मालाची वाहतूक सुरू राहील, याकरिता वाहतुकीचे नियोजन करण्यात यावे, असे सहसचिव राजेंद्र होळकर यांनी दिलेल्या आदेशात नमूद आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २६ ऑगस्ट २०२४
पान : ८
www.diwanews.com











# सामाजिक कार्यकर्ते कैलेश पाटील यांच्याकडून माजी नगरसेवक शैलेश पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

दिव्यातील मा.नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्यकर्ते व शिवसेना उपविभाग प्रमुख कैलेश पाटील यांनी दरवर्षीप्रमाणे यावर्षीही नागरिकांना मोफत छत्री वाटप व अन्नधान्य वाटप केले. यावेळी शाखाप्रमुख प्रदीप पाटील, मुंब्रादेवी शाखाप्रमुख सुरेश जगताप, उपशाखाप्रमुख भरत मोहिते, आदित्य कदम, रुपेश लाड, संतोष तांबे, अनिल विश्वकर्मा अशोक नरे, एकनाथ जाधव, ईश्वर कांबळे, विनायक निंबाळकर, राहुल जयस्वाल, उमेश पवार, सुरज पगारे, सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.







